PMKSY व BJSY या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रू.१५,००० कोटीचे दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: पीएलएन-२०१८/प्र.क्र.२८६/निवसं-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०९ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना :-

राज्यात पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून अनेक विकासाची कामे हाती घेण्यात येतात. राज्यात सिंचनाचे महत्व विचारात घेऊन पाटबंधारे प्रकल्प हाती घेण्यासाठी लोकप्रतिनिधी सतत आग्रही असतात. शासनाने अनुशेष निर्मुलन, लवादानुसार राज्याच्या वाटयास आलेल्या पाण्याचा विनियोग करण्यासाठी, अवर्षणप्रवण भागास सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अनेक पाटबंधारे प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यामुळे राज्यातील बांधकामाधीन पाटबंधारे प्रकल्पांची संख्या मोठी आहे. राज्यात सद्यस्थितीत ३३४ बांधकामाधीन प्रकल्पांची कामे चालू आहेत. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासन दरवर्षी रू.८००० ते रू.९००० कोटींचा निधी जलसंपदा विभागास उपलब्ध करून देते. परंतु लाभक्षेत्र विकास कार्यक्रम, खारभूमी, जलविद्युत प्रकल्प, पूरनियंत्रण इत्यादी कामांसाठी तसेच सामायिक योजना (जलविज्ञान प्रकल्प, गुणनियंत्रण संघटना इ.) कामासाठी आवश्यक तरतूदी वजा जाता पाटबंधारे प्रकल्पांसाठी रू.७५०० कोटी उपलब्ध होतात. या आर्थिक तरतूदीतून बांधकामाधीन प्रकल्पांची भाववाढीमुळे होणारी किंमतीतील वाढ भरून निघू शकते. तथापि प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे उर्वरित बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधीचा अतिरिक्त स्त्रोत निर्माण करणे आवश्यक झाले आहे.

राज्यातील बांधकामाधीन प्रकल्पांपैकी जे प्रकल्प प्रगत अवस्थेत आहेत व ते प्रकल्प तातडीने पूर्ण करून पुढील तीन वर्षांमध्ये सिंचनाचा लाभ प्राप्त होऊ शकेल, असे पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रू.१५००० कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज वित्तीय संस्थांकडून उपलब्ध करून घेण्याचा निर्णय दिनांक ७ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना व बळीराजा जलसंजीवनी योजना या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून उर्वरित प्रकल्पांपैकी प्रगतीपथावर असणारे व पुढील तीन वर्षात पूर्ण होणाऱ्या ५२ प्रकल्पांसाठी (सोबतच्या यादीनुसार) सन २०१९-२० ते सन २०२१-२२ या तीन वर्षांत रू.१५००० कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज वित्तीय संस्थांकडून घेण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) जलसंपदा विभागाने नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या मदतीने उक्त कर्ज सहाय्य उपलब्ध करून घेण्यासाठी कमीत कमी व्याजदर व मुद्दल परतफेडीसाठी दीर्घ मुदत या बाबींचा विचार करून वित्तीय संस्था निश्चित करावी.

२) जलसंपदा विभागाने या कर्जाचा विनियोग करुन राज्यात २.९० लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता आणि ८९१ द.ल.घ.मी. पाणीसाठा येत्या तीन वर्षामध्ये निर्माण करण्यासाठी प्रकल्पांचे नियोजन करावे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९०९१३२०२६७५२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHAILA BABAN YADAV

Digitally signed by SHAILA BABAN YADAV
DN: CN = SHAILA BABAN YADAV, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WATER RESOURCES DEPT
Date: 2019.09.09 13:47:28 +05'30'

**( शैला ब. यादव )**

**कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव.

३) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

४) मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई

५) मा. मुख्य सचिव यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई

६) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई .

७) महालेखाकार कार्यालय, मुंबई / नागपूर

८) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.

९) सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे

१०) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११) सर्व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१२) सर्व अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.

१३) सर्व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे

१४) सर्व उपविभागीय अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/ औरंगाबाद/ पुणे/ जळगाव/ ठाणे.

१५) निवसं-१ कार्यासन संग्रहार्थ.

# प्रगती पथावरील पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी दिर्घ मुदतीचे कर्ज घेण्यासाठी प्रकल्पांची यादी

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **उर्वरित महाराष्ट्र** | |
| १ | वरणगांव तळवेल उपसा सिंचन योजना | मोठे |
| २ | भागपूर उपसा सिंचन | मध्यम |
| ३ | निम्न तापी | मोठे |
| ४ | वाडी शेवाडी | मध्यम |
| ५ | नागन | मध्यम |
| ६ | प्रकाशा बुराई उपसा | मध्यम |
| ७ | दुधगंगा | मोठे |
| ८ | जिहे कठापूर | मोठे |
| ९ | वाकुर्डे उपसा | मोठे |
| १० | कलमोडी | मध्यम |
| ११ | आंबेओहोळ | मध्यम |
| १२ | नागनवाडी | लघु |
| १३ | उचंगी | लघु |
| १४ | बार्शी उपसा | मोठे |
| १५ | सोनुर्ले | लघु |
| १६ | कोर्ले सातंडी | मध्यम |
| १७ | लेंढी | लघु |
| १८ | ओझर | लघु |
| १९ | पोयनार | लघु |
| २० | तिडे | लघु |
| २१ | बेर्डेवाडी | लघु |
| २२ | विर्डी | लघु |
| २३ | नाधवडे | लघु |
| २४ | देदोंदवाडी | लघु |
| २५ | ओटाव | लघु |
| २६ | खोलसापाडा-१ | लघु |
| २७ | कुशिवली | लघु |
| २८ | आसगा(होसोळ) | लघु |
| २९ | उर्ध्व प्रवरा (निळवंडे-२) | मोठे |
| | **एकूण उर्वरित महाराष्ट्र** | |
| | **मराठवाडा** | |
| ३० | कृष्णा-मराठवाडा प्रकल्प | |
| A | कृष्णा- भिमा स्थिरीकरण | |
| | लिंक-५ | मोठे |

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| B | कृष्णा-मराठवाडा प्रकल्प | |
| | उपसा -१ (स्टेज १ ते ५) | मोठे |
| | उपसा -२ (स्टेज १ ते ५) | |
| | उपसा - ३ | |
| ३१ | पिंपळखुटा | लघु |
| ३२ | हळदवाडी | लघु |
| ३३ | बोराळा-२ | लघु |
| ३४ | अंभेरी | लघु |
| ३५ | नवलगव्हाण | लघु |
| ३६ | अरणवाडी सा.त. | लघु |
| | **एकूण मराठवाडा** | |
| | **विदर्भ** | |
| | **नागपूर विभाग** | |
| ३७ | रजेगाव काटी | मध्यम |
| ३८ | लालनाला | मध्यम |
| ३९ | चिचघाट उपसा | मध्यम |
| ४० | दिंडोरा बॅरेज | मध्यम |
| ४१ | सुरेवाडा उपसा | मध्यम |
| ४२ | कोटगल बॅरेज | मध्यम |
| ४३ | निम्न चुलबंद | लघु |
| ४४ | लखमापूर | लघु |
| ४५ | पिंडकेपार | लघु |
| | **अमरावती विभाग** | |
| ४६ | टाकळी डोलारी | मध्यम |
| ४७ | वर्धा बॅरेज | मध्यम |
| ४८ | पंढरी | मध्यम |
| ४९ | गर्गा बॅरेज | मध्यम |
| ५० | बोर्डी नाला | मध्यम |
| ५१ | कु-हा वडोधा (विदर्भ हिस्सा) | मोठे |
| ५२ | बोदवड उपसा (विदर्भ हिस्सा) | मोठे |
| | **एकूण विदर्भ** | |
| | **एकूण महाराष्ट्र** | |
| | | |
| **१०** | **मोठे** | |
| **१८** | **मध्यम** | |
| **२४** | **लघु** | |
| **५२** | **एकूण** | |
| **२९** | **उर्वरित महाराष्ट्र** | |
| **७** | **मराठवाडा** | |
| **१६** | **विदर्भ** | |
| **५२** | **एकूण** | |